**कॉ. तुकाराम भस्मे**
सेक्रेटरी
**कॉ. (ॲड.) सुभाष लांडे / कॉ. नामदेव गावडे**
सहसेक्रेटरी

महाराष्ट्र राज्य कौन्सिल

**भारतीय कम्युनिस्ट पक्ष**

३१४, राजभुवन, सरदार वल्लभभाई पटेल रोड, गिरगाव, मुंबई ४००००४ • दूरध्वनी : २३८५७०७७ • फॅक्स : २३८५८०४४

**सर्व जिल्हा सचिव व राज्य कौन्सिल सदस्य** **दिनांक : १८-०७-२०१९**

# राज्य कौन्सिलचे निर्णय

**प्रिय कॉम्रेड**
**लाल सलाम!**

पक्षाच्या राज्य कौन्सिलची बैठक दि. १५ व १६ जुलै २०१९ रोजी अमरावती येथे **कॉ. प्रकाश नार्वेकर, कॉ. सुनिल मेटकर, कॉ. स्मिता पानसरे** यांच्या अध्यक्षतेखाली झाली. या सभेला कॉ. विनय विश्वम राज्य सभेच्या अधिवेशनाच्या कामामुळे उपस्थित राहू शकले नाहीत. पक्षाच्या राष्ट्रीय सचिव मंडळाचे नेते कॉ. डॉ. भालचंद्र कानगो यांनी मार्गदर्शन केले. पक्षाच्या वतीने चर्चेकरिता आलेल्या टिपणासंबंधाने लोकसभा निवडणूकीचा आढावा घेण्यात आला. पक्षाच्या राष्ट्रीय कार्यकारिणीने केलेल्या निरिक्षणाच्या आधारे लोकसभा निवडणूकीमध्ये मोदींच्या नेतृत्वाखाली पुन्हा देशात सत्ताधारी होणे देशाकरिता घातक असून डाव्या, धर्मनिरपेक्ष लोकशाहीवादी राजकीय पक्षांना आव्हान आहे. लोकशाही विरोधी, धर्मांध शक्तींचा उन्माद, झुंडशाहीला राजकीय आश्रय देण्याचा धोका वाढवणारा व्यवहार निवडणूकीनंतर सुरू झाल्याचे जनतेला अनुभव येत आहेत.

वित्त भांडवलाला मोकळे रान करणारे, आर्थिक धोरण गतिमान करणारे, सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगांची कोंडी करून (BSNL) देशी-परदेशी, खाजगी कंपन्यांच्या ताब्यात जाईल असा व्यवहार आहे. सार्वजनिक बँकांकडून कर्ज घेऊन बुडीत टाकणाऱ्या बड्या उद्योगपतींना अभय निर्माण झाले असून केंद्रीय बजेटच्या निरिक्षणावरून हे उघड झाले आहे. यामुळे जनतेवरील संकट वाढणार आहे हे स्पष्ट झाले आहे. यासाठी कामगार, कष्टकरी जनतेला मोदी सरकारविरुद्ध संघर्षाला सामोरे जाणे भाग आहे. राजकीय अज्ञान, राष्ट्रवादी भावना, हिंदुत्वाच्या छुप्या आवाहनाला बळी पडलेल्या देशातील जनतेला जागृत करून आर्थिक प्रश्नांबरोबर लोकशाही अधिकार, संविधानाचे रक्षण, शेती, ग्रामिण व शहरी कष्टकरी जनतेच्या फार मोठ्या विभागाला संघटीत करून मोदींच्या नेतृत्त्वाखालील भाजप सरकारविरुद्ध संघर्ष करण्यासाठी पुढाकार घेण्याची गरज आहे. त्यासाठी पक्ष संघटना, जनसंघटना यातील तरुण कार्यकर्त्यांचे राजकीय शिक्षण करणे अत्यावश्यक आहे. याबाबतच्या पक्ष धोरणाची मुख्य दिशा मान्य करून येणाऱ्या विधानसभेच्या निवडणूका याबाबतची एकूण कार्यवाही राज्य पक्षाला करावी लागेल. पक्षाच्या राज्य कार्यकारिणीला याबाबत तातडीने योग्य ती कार्यवाही करण्याची जबाबदारी राज्य कौन्सिलने दिली आहे. याबाबत काही निर्णय घेण्यात आले आहेत. त्याची अंमलबजावणी करणे, सर्व पक्षप्रमुखांची येत्या काळातील मुख्य: जबाबदारी आहे.

**निर्णय :**

पक्ष सभासद नोंदणी-पुनर्नोंदणी करणे- तक्ते व फी राज्य केंद्राकडे पाठविणे.

विधानसभा निवडणूकीसाठी ज्या ठिकाणाहून उमेदवारासह प्रस्ताव आलेले आहेत तेथे तयारी सुरू करणे.

विधानसभा निवडणूकीसंबंधाने पक्षाच्या मुख्य उद्दिष्टासंबंधाने राजकीय व्यवहार करावा.

जेथे आपण निवडणूक लढणार आहोत तेथे ताबडतोबीने फंड (निधी) जमा करण्यात यावा. घेतलेले कोटे पूर्ण करावेत.

पक्षाच्या संघटनात्मक राष्ट्रीय परिषदेच्या निमित्ताने सर्व जिल्हा कौन्सिलनी संघटनात्मक परिषदांचे आयोजन करावे. तारखा नक्की करून राज्य केंद्राला कळवाव्या.

राज्य किसान सभेचे दि. ३ ऑगस्ट २०१९ रोजी पुणे येथील कृषि आयुक्त कार्यालय, मध्यवर्ती बिल्डिंग येथे बेमुदत धरणे आंदोलनाला सर्व जिल्हा सचिवांनी सर्वतोपरि सहकार्य करावे. सर्व जिल्ह्यांतून किसान कार्यकर्ते या आंदोलनामध्ये सहभागी होतील याची तयारी करावी.

पक्षाचे सतत दुर्लक्ष झालेल्या युवक फेडरेशनच्या कामाबाबत संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी देशातील बेरोजगारी विरुद्ध आंदोलनाचा निर्णय घेतला. येत्या ९ ऑगस्टला सर्व जिल्ह्यांत **'भगतसिंह राष्ट्रीय बेरोजगार हमी कायदा'** या मागणीला लक्ष्य करून धरणे, सभा, मोर्चे याप्रमाणे आंदोलन करावे. सर्व जिल्हा सचिवांनी या कार्यक्रमाला आपली जबाबदारी समजावी व सहकार्य करावे. पक्षातील तरूण कार्यकर्त्यांना याकरिता प्रोत्साहीत करावे. याच संघटना पातळीवर राज्य शिबीर शनिवार दि. १७ व रविवार दि. १८ ऑगस्ट २०१९ या कालावधीत श्रमशक्ती भवन, आकुर्डी, बजाज ऑटो समोर, पुणे येथे दोन दिवसांचे संघटना बांधणी व राजकीय प्रबोधन शिबिर आयोजित करण्यात आले आहे. यासाठी प्रत्येक जिल्ह्यातून किमान दोन प्रतिनिधी उपस्थित राहतील यासाठी प्रयत्न करावेत.

या दोन्ही कार्यक्रमांच्या तयारीसाठी प्रत्येक जिल्ह्याने AIYF ची बैठक बोलवावी. या बैठकीला राज्याचे प्रतिनिधी उपस्थित राहणार आहेत. बैठकीची तारीख, वेळ, स्थळ सी.पी.आय. राज्य WhatsApp ग्रुपवर कळवावी.

**कॉ. अण्णा भाऊ साठे शताब्दी वर्ष** म्हणून १ ऑगस्ट २०१९ ते १ ऑगस्ट २०२० या काळात सर्व जिल्ह्यांत कार्यक्रमाचे आयोजन करावे. मुख्य कार्यक्रम मुंबई येथे होईल.

**कॉ. कैफी आजमी** - थोर कलावंत यांच्या जन्मशताब्दीचा भव्य-दिव्य कार्यक्रम रविंद्र नाट्य मंदिर, प्रभादेवी, मुंबई येथे दि. १६ ऑगस्ट २०१९ रोजी होत आहे. या निमित्ताने प्रत्येक जिल्ह्याने दोन-तीन कलावंत, लेखक या कार्यक्रमाकरिता जिल्हा सचिवांनी प्रयत्न करून पाठविले पाहिजेत. कार्यक्रम पत्रिका पाठविण्यात येईल.

युगांतर, मुक्ती संघर्ष, न्यू एज साप्ताहिकांचे सर्व राज्य कौन्सिल सदस्यांनी वर्गणीदार झाले पाहिजे. सर्व जिल्हा कौन्सिल सभासदांनी किमान युगांतर साप्ताहिकाचे वर्गणीदार झाले पाहिजे. ही जबाबदारी जिल्हा सचिवांनी घेणे गरजेचे आहे.

आपला

**(कॉ. तुकाराम भस्मे)**
**सचिव, भारतीय कम्युनिस्ट पक्ष**
**महाराष्ट्र राज्य कौन्सिल**